सकाळ



गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटीतर्फे सुजाता पोडजाळे यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना शिवानंद घुगरे, एम. एल. चौगुले. शेजारी नंदकुमार शेळके, डॉ. आर. एस. निळपणकर, प्रदीप अभ्यंकर, बाबासाहेब मार्तंड आदी.

# 'रवळनाथ'ची मृत कर्मचाऱ्याच्या वारसांना पाच लाखांची मदत

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १ : येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे कर्मचारी दयानंद पोडजाळे यांचे निधन झाले. त्यांच्या वारसांना रवळनाथतर्फे पाच लाख रुपयांची, तर रवळनाथ सेवक पतसंस्थेतर्फे एक लाख रुपयांची मदत देण्यात आली.

पोडजाळे गेल्या १८ वर्षांपासून रवळनाथ सोसायटीच्या गडहिंग्लज शाखेकडे पिग्मी संकलक कम परिचर म्हणून कार्यरत होते. कर्तव्यदक्ष व गुणवंत कर्मचारी म्हणून त्यांची ओळख होती. रवळनाथ सोसायटीतर्फे पाच लाखांचा धनादेश संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते, तर रवळनाथ सेवक पतसंस्थेतर्फे एक लाखांचा धनादेश व्यवस्थापक शिवानंद घुगरे यांच्या हस्ते देण्यात आला. सुजाता पोडजाळे व मुलांनी तो स्वीकारला. या वेळी संचालक डॉ. आर. एस. निळपणकर, प्रदीप अभ्यंकर, नंदकुमार शेळके, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड आदी उपस्थित होते.

# रवळनाथच्या मयत कर्मचाऱ्याच्या वारसांना ५ लाखांची मदत



गडहिंग्लज : पोडजाळे यांचे वारस श्रीमती सुजाता पोडजाळे यांना धनादेश सुपूर्द करताना संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, डॉ. आर. एस. निळपणकर, प्रदीप अभ्यंकर, नंदकुमार शेळके, शिवानंद घुगरे आदी.

प्रतिनिधी
गडहिंग्लज

येथील रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीचे कर्मचारी दयानंद पोडजाळे यांचे १५ सप्टेंबर रोजी आकस्मित निधन झाले. दयानंद पोडजाळे हे १८ वर्षे संस्थेकडे पिग्मी संकलन, शिपाई म्हणून काम करत होते. त्यांच्या निधनाने कुटुंबियांना मदत म्हणून संस्थेमार्फत ५ लाखाचा धनादेश संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते आणि रवळनाथ सेवक पतसंस्थेचा १ लाखाचा धनादेश व्यवस्थापक शिवानंद घुगरे यांच्या हस्ते श्रीम सुजाता पोडजाळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी डॉ. आर. एस. निळपणकर, प्रदीप अभ्यंकर, नंदकुमार शेळके, पीआरपो बाबासाहेब मार्तंड यांच्यासह अन्य उपस्थित होते.

तरुण भारत Fri, 02 October 2020 https://epaper.tarunbharat.